## नियमित दिवाणी दावा क्रमांक ५५५/२०२१ मधील आदेश नि.क्र.३४
(CNR No.MHSO130006822021)

१. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुध्द दि.१४/३/२०२२ रोजी पारीत विना कैफियत आदेश व नि.क्र.१ वर दि.२८/३/२०२३ रोजी पारीत करण्यात आलेला आदेश रद्दबातल करण्यात यावा याबाबत विनंती केली आहे.

२. प्रतिवादीचे अर्जातील कथन असे आहे की, प्रतिवादीविरुध्द दि.१४/३/२०२२ रोजी विना कैफियत आदेश झालेले आहेत. तदनंतर प्रतिवादी यांनी विनाकैफियत आदेश रद्दबातल करण्यात यावा याबाबत अर्ज केला तो अर्ज दि.१९/१/२०२३ रोजी प्रतिवादीने रक्कम रुपये ८००/– चे खर्चावर मंजूर करुन प्रतिवादीने पुढील तारखेपर्यंत वादीस खर्च द्यावा असा आदेश केला होता. प्रतिवादी सदरची खर्चाची रक्कम भरण्यास तयार होते परंतु काही अपरिहार्य कारणामुळे पुढील तारखेपर्यंत खर्चाची रक्कम भरण्यास प्रतिवादी यांना झाले नाही. दि.१९/१/२०२३ रोजी प्रतिवादी खर्चाची रक्कम भरण्यास तयार होते परंतु दि.२८/३/२०२३ रोजी नि.क्र.१ वर न्यायालयाने आदेश पारीत केले आहे. तरी प्रतिवादी न्यायालयात खर्चाची रक्कम भरण्यास तयार असुन ती स्वीकारण्यात यावी आणि प्रतिवादीविरुध्द दि.१४/३/२०२२ रोजीचा विना कैफियत आदेश व दि.२८/३/२०२३ रोजी नि.क्र.१ वर पारीत केलेला आदेश रद्दबातल करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

३. सदर अर्जावर वादीचे म्हणणे मागविण्यात आले. वादीने त्यांचे म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादीचा अर्ज व त्यामधील मजकूर खोटा आहे. प्रतिवादी यांनी मुदतीत कैफियत दिली नाही म्हणून त्यांचेविरुध्द न्यायालयाने विना कैफियतचा आदेश केलेनंतर प्रतिवादी यांनी नि.क्र.३२ प्रमाणे विना कैफियत आदेश रद्दबातल चा अर्ज दाखल केला. सदरील अर्जावर न्यायालयाने दि.१९/१/२०२३ रोजी खर्च रुपये ८००/– देणेचे व सदरील खर्च पुढील तारखेपर्यंत देणेकरिता अटीचे आदेश केले आहे. त्याप्रमाणे प्रतिवादी यांनी खर्च दिला नाही अगर आदेशाचे पालन केले नाही. म्हणून दि.२८/३/२०२३ रोजी प्रतिवादीविरुध्द विना कैफियत दावा सुरु ठेवणेबाबतचा आदेश केला आहे. सदर आदेशाप्रमाणे प्रतिवादीस अपिल करणे कायदेशीर आहे परंतु प्रतिवादीने पुन्हा विना कैफियत आदेश रद्दबातलचा अर्ज दाखल केला आहे. तो कायदेशीर नसून टेनेबल नाही. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा. जर अर्ज मंजूर करावयाचे मतास न्यायालय आल्यास प्रतिवादीस खर्च रुपये ५०००/– करण्यात यावी.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. सदर अर्जावर वादी व प्रतिवादी यांचा युक्तीवाद ऐकला. सदरचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द निरंतर मनाईकरिता दाखल केला आहे. प्रतिवादी यांना दाव्याचे समन्स दि.२४/१०/२०२१ रोजी प्राप्त झाल्याचे

बेलिफ अहवालावरुन दिसून येते. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८ नियम १ प्रमाणे वादीच्या दाव्यास प्रतिवादीने समन्स प्राप्त झालेपासून ३० दिवसाचे आत कैफियत दाखल करायची असते. यापूर्वी सदर दाव्यामध्ये दि.१४/३/२०२२ रोजी प्रतिवादीविरुध्द म्हणणे नाही चा आदेश पारीत करण्यात आला होता. सदर आदेश दि.१९/१/२०२३ रोजी नि.क्र.३२ वरील आदेशाप्रमाणे खर्चासह रद्द करण्याचा आदेश पारीत झालेला होता परंतु प्रतिवादीने सदर खर्चाची रक्कम न भरल्यामुळे दि.२८/३/२०२३ रोजी पुन्हा प्रतिवादीविरुध्द म्हणणे नाही चा हुकूम पारीत करण्यात आला.

५. याठिकाणी हे नमूद करणे जरुरीचे आहे की, सदर दाव्यामध्ये नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून घेणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन न घेतल्यास प्रतिवादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे याउलट प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास व प्रतिवादीविरुध्द पारीत विना कैफियत आदेश रद्दबातल केल्यास दावा गुणावगुणावर चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. त्याअनुषंगाने प्रतिवादी यांनी वादीच्या दाव्यास कैफियत दाखल करण्यास केलेल्या विलंबाचा विचार करता प्रतिवादीवर खर्च बसवून अर्ज मंजूर करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य वाटते. प्रतिवादीने पूर्वी लादलेला वादखर्च देण्यास बराच विलंब केलेला आहे त्यामुळे सदर आदेशान्वये प्रतिवादीस वादखर्चाची रक्कम आजरोजी न्यायालयात जमा करण्याचा आदेश देणे उचित होईल. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करणे न्यायोचित होईल.

## आ दे श

१. प्रतिवादी यांचेवर रक्कम रुपये रु.५००/– (रक्कम रुपये पाचशे) खर्च बसवून अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादीस दिल्यानंतर त्यांचेविरुध्द पारीत विना कैफियत आदेश रद्दबातल होईल.

३. प्रतिवादी यांनी दि.१९/१/२०२३ रोजीचा आदेश व सदर आदेशाची खर्चाची रक्कम वादीस आजरोजी द्यावी.

बार्शी. (श्रीमती एच.यु.यु.पाटील)

दिनांकः– ०८/०६/२०२३ ४थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Y. V. Sital |
| (b) | Court | : | Smt. H.U.U. Patil,<br>4th Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 8.6.2023 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 9.6.2023 |